माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १०२५/२०२२**

**अपिलार्थी, श्री. रविन्द्र शेषराव डोंगरे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
सावनेर विभाग, ता. सावनेर, जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक,**
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२१ | ०७.०८.२०२१ | ३०.०८.२०२१ | १८.०९.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २६.०७.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "दिनांक १८.०५.२०२१ रोजी तसेच दिनांक २५.०६.२०२१ रोजी व दिनांक ०५.०७.२०२१ रोजी लेखी तक्रार रिपोर्ट केली त्या रिपोर्ट वर केलेल्या कारवाईची संबंधित संपुर्ण दस्ताऐवजाची सत्यप्रत देण्यात यावी" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, सदर माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने ठाणेदार खापा तथा सहायक माहिती अधिकारी यांनी अहवालासह माहिती सादर केलेली असून त्यांनी सादर केलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. त्यात १) अहवाल प्रत २) एन.सी. क्र. ३६६/२१ प्रत एकूण २ पेजेस अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ३०.०८.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "अपेक्षित माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.०९.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक १८.०९.२०२१ अन्वये, सदर

प्रकरणी अपिलार्थी यांनी मा.अ.अधी. अर्जात नमूद केलेल्या तारखांना दिलेल्या तक्रारीवर त्यास माहिती पुरविणे अपेक्षित आहे. तरी सहा. माहिती अधिकारी तथा ठाणेदार खापा यांनी अपिलार्थी यांचे माहिती अर्जात नमूद तारखांच्या तक्रारीबाबत पो.स्टे. च्या अभिलेखावर उपलब्ध असलेली व कायद्याने देय असलेली माहिती संकलित करुन १५ दिवसात अपिलार्थीस पुरवावी, जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, सावनेर यांनी माहिती पुरवितांना आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती पुरविली जाईल याची शहानिशा करुनच माहिती पुरविण्याची दक्षता घ्यावी. माहिती पुरविल्याबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १२.०४.२०२२ रोजी** " माहिती मिळाली नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १२.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे व्यक्तीश: उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल दहिभाते, सहायक पोलीस निरीक्षक हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. विनोद सरादे हे व्यक्तीश: उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १८.०९.२०२१ रोजीच्या आदेशानुसार सहायक जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन खापा यांनी त्यांचे पो.स्टे. जावक क्रमांक १७१३/२१ दिनांक २५.१०.२०२१ अन्वये अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेली संपुर्ण कागदपत्रे पो.स्टे. खापा येथे प्रत्यक्ष बोलावून पुरविल्याबाबत तसेच अर्जदार यांचेकडून माहिती मिळाल्याबाबत लिहून घेवून स्वाक्षरी घेण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे. तसेच अर्जदार यांना फोनव्दारे विचारपुस करुन माहिती मिळाली किंवा नाही याबाबत शहानिशा केली असता, त्यांनी पो.स्टे. खापा येथून माहिती मिळाल्याचे सांगितले आहे, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांनी दिनांक २७.१०.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर केलेला आढळून येतो. मात्र अपिलार्थी यांच्या म्हणण्यानुसार त्यांचेवर झालेल्या हल्ल्यानुसार कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही तसेच संबंधित अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याचे नमूद केले आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

उपरोक्त प्रकरणी सादर केलेले जोडपत्र-अ, ब व क चे अवलोकन केले असता, तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचे दिनांक १७.०९.२०२१ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता, यात कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली व कायद्याव्दारे देय असलेली माहिती देण्याचे निर्देश दिलेले असून त्याप्रमाणे दिनांक २७.०९.२०२१ रोजी प्रत्यक्षात अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली असल्याचे आढळून येते. याबाबतीतील अनुपालन अहवाल अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर यांचेकडे सादर केला आहे. प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांना गैरअर्जदारांवर कार्यवाहीची अपेक्षा दिसून येत आहे. प्रस्तूत बाब माहिती अधिकार कायद्याच्या कार्यकक्षेच्या बाहेरची असून याबाबतीत अपिलार्थी यांनी कायद्याव्दारे दिलेल्या अधिकारांतर्गत योग्य ती पाऊले उचलण्याच्या सुचनेसह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०६.२०२४**

जावक क्रमांक ६६५८ दिनांक 27 SEP 2024